# प्र क र ण – ५ वे.

## निष्कर्ष व शिफारशी

## प्रकरण ५ वे - निष्कर्ष व शिफारशी.

५.१ - सारांश

५.२ - निष्कर्ष

अ] स्त्री - शिक्षणाबाबतचे निष्कर्ष.

ब] विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या मुलांचे शिक्षणाबाबतचे निष्कर्ष.

क] अंधश्रध्दा व जातीभेदाबाबतचे निष्कर्ष.

ड] वसतिगृहातील मुलांचा आहार व व्यायाम याबाबतचे निष्कर्ष.

इ] नेतृत्व गुण व श्रमनिष्ठा याबाबतचे निष्कर्ष.

ई] शेतक-यामध्ये जागृती याबाबतचे निष्कर्ष.

प] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यासाठी विविध व्यवसायात काम याबाबतचे निष्कर्ष.

फ] कर्मवीर डॉ. मामासाहेबांचे जीवन व विविध समाज घटकात त्यांच्या बाबतच्या भावना याबाबत चे निष्कर्ष.

म] निष्कर्षाचा सारांश.

५.3 शिफारशी.

अ] स्त्री - शिक्षणाबाबतच्या शिफारशी.

ब] विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतच्या शिफारशी.

क] अंधश्रध्दा व जातीभेदाबाबत शिफारशी.

ड] वसतिगृहातील मुलांचा आहार व व्यायाम याबाबतच्या शिफारशी.

इ] नेतृत्व गुण व श्रम निष्ठा याबद्दलच्या शिफारशी.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ई ] शेतक-यात जागृती याबाबतच्या शिफारशी.

प] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यासाठी काम याबाबतच्या शिफारशी.

फ ] कर्मवीर डॉ. मामासाहेबांचे जीवन याबाबतच्या शिफारशी.

५.४ - पुढील संशोधनासाठी विषय.

::::::::::

## ५.१ - सारांश -

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी शिक्षण क्षेत्रात बहुमोल असे कार्य केलेले आहे. प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय करणे एवढयाच बाबी मामासाहेबांनी केल्या नाहीत तर समाजालाच शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. स्त्री- शिक्षण, अंधश्रध्दा, अनिष्ठ रुढी, मानपान व शेतक-यांचे अज्ञान नाहीसे करणे याबाबत समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

अभ्यासकाने " सामाजिक शिक्षणासाठी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी केलेल्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला होता. अभ्यासकाने संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. अभ्यासकाने प्रश्नावली, मुलाखती, संस्थांना भेटी, प्रकाशित साहित्याचा अभ्यास व ध्वनीफिती या साधनांद्वारे माहिती मिळवली. मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन केले. मागील प्रकरण ४ मध्ये संपूर्ण माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन केले आहे. या प्रकरणात निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय या बाबी दिलेल्या आहेत.

## ५.२ - निष्कर्ष -

अभ्यासकाने उद्दिष्टानुसार पृथ:करण व अर्थनिर्वचन केले आहे. त्यानुसारच निष्कर्ष खाली दिलेले आहेत.

अ) स्त्री- शिक्षणाबाबतचे निष्कर्ष -

मुलांच्या शिक्षणापेक्षाही मामासाहेब मुलींच्या शिक्षणाला महत्व देत असत. मुलींच्या शिक्षणाबाबतच्या अडचणी मामासाहेबांना जाणवल्या.

मुलींची राहण्या जेवणाची गैरसोय या अडचणीस प्रश्नावलीत शेकडा ३४.१ इतका प्रतिसाद आहे तर मुलाखतीत शेकडा ९० प्रतिसाद मिळाला आहे. शाळेची गैरसोय या अडचणीस शेकडा २७.४४ इतका प्रतिसाद प्रश्नावलीत मिळाला आहे. पालकांचा दृष्टीकोन या अडचणीस मुलाखतीत शेकडा ९०% प्रतिसाद मिळाला. स्त्री शिक्षणात मुलींची राहण्या जेवणाची गैरसोय व पालकांचा दृष्टीकोन याच प्रमुख अडचणी मामासाहेबांना जाणवल्या होत्या.

स्त्री- शिक्षणातील अडचणी निवारण करण्याचा प्रयत्न मामासाहेबांनी केला. शिक्षण घेणा-या मुलींची राहण्याजेवणाची सोय केली. या प्रयत्नास प्रश्नावलीत शेकडा १०० प्रतिसाद मिळाला स्त्रियांनी शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात पुरुषाप्रमाणे काम करावे असेच मामासाहेबांचे मत होते. या मतास प्रश्नावलीत ९८.७१ टक्के प्रतिसाद मिळाला आहे, तर मुलाखतीत शेकडा ७५ प्रतिसाद मिळाला आहे.

मामासाहेब मुलींच्या शिक्षणाला महत्त्व देत असत. मुलींच्या शिक्षणात राहण्या जेवणाची गैरसोय व पालकांचा दृष्टिकोन याच महत्वाच्या अडचणी होत्या. १९४७ साली मुलींसाठी " भारतीय बालीकाश्रम " हे वसतिगृह सुरु केले.

ब] विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या मुलांचे शिक्षण -

विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या बद्दल मामासाहेबांच्या मनात सहानुभूती होती. [ प्रश्नावली २६.९२%] सहानुभूती असली तरी त्यांची वसतिगृहात मोफत जेवणाची व्यवस्था केली नाही. विधवा व परित्यक्ता यांना वसतिगृहात स्वयंपाक करण्याचे काम दिले. त्यांची त्यांच्या मुलांची वसतिगृहात राहण्याची जेवणाची व्यवस्था केली व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली व विधुरांना शेतावरील काम दिले.

[ मुलाखत प्रतिसाद ९५ टक्के प्रश्नावली ९८.७ टक्के प्रतिसाद]. विधवा विधुर व परित्यक्ता त्यांना काम देवून स्वतःच्या पायावर उभे केले पाहिजे असेच मामांचे मत होते [ प्रश्नावली प्रतिसाद ८८.४६ टक्के ]. मोफत मिळाल्यानंतर श्रम करण्याची आवड नष्ट होते व ऐतखाऊ तयार होतात असे मामांचे मत होते.

विधवांना मुले असतील विवाह न करता त्यांनी मुलांचे पालन पोषण करावे असे मामांचे मत होते. [ प्रश्नावली - शेकडा ९४.८७ प्रतिसाद ] मामा मुलांच्या पालन पोषणास व शिक्षणास महत्त्व देतात. विधवांनी विवाह करावेत असेही मामांचे मत होते [ मुलाखत - शेकडा ५० प्रतिसाद व प्रश्नावली - शेकडा १४.१० प्रतिसाद ]

७८ प्रतिसादकांच्या उत्तरांतून वसतिगृहातील विधवांची निरनिराळ्या सालांत असणा-या विधवांची इ. नांवे मिळाली. ज्यांच्या आई किंवा वडिलांने काम केले आहे व ज्यांचे शिक्षण झाले आहे. अशा ३४ विद्यार्थ्यांची नांवे मिळाली.

विधवांची व परित्यक्तांची समाजाची स्थिती मामांनी पाहिली. त्यांच्याकडे व त्यांच्या मुलांच्याकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन बरोबर नव्हता. मामांनी मार्ग शोधला व त्यांना वसतिगृहात काम दिले. त्यांची राहण्याची सोय केली. त्यांना आधार दिला व त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली.

क] अंधश्रध्दा व जातीभेदाबाबतचे निष्कर्ष -

कर्मवीर मामासाहेबांना वर्णव्यवस्था मान्य नव्हती. या विधानास प्रश्नावलीत शेकडा ९८.७२ तर मुलाखतीत शेकडा १०० प्रतिसाद मिळाला.

वर्ण व्यवस्था, जातपात व अंधश्रध्दा नष्ट करण्याकरिता मामांनी विविध प्रयत्न केले. वसतिगृहात सर्व जाती जमातीच्या मुलांना एकाच पंगतीत जेवण असे.

[ प्रश्नावली शेकडा १०० प्रतिसाद ] वाढपी सर्व जाती जमातीतील असत. या विधानास प्रश्नावलीतून ८९.७४ टक्के प्रतिसाद मिळाला तर मुलाखतीतून शेकडा १०० टक्के प्रतिसाद मिळाला. वसतिगृहातील स्वयंपाक कामात सर्व जाती जमातीच्या स्त्रिया होत्या या विधानास प्रश्नावलीतून ९३.५८ टक्के प्रतिसाद तर मुलाखतीतून ८५ टक्के प्रतिसाद मिळाला. वसतिगृहात सर्वांना प्रवेश होता. [ प्रश्नावली प्रतिसाद शेकडा ९४.८७ ]. आंतरजातीय विवाह लावून देण्याचा प्रयत्न केला [ प्रश्नावली प्रतिसाद २३.०७]. विवाह कमी खर्चात लावले या विधानात मुलाखतीतून शेकडा ७५ प्रतिसाद मिळाला. हुंडा बंदीच्या शपथा घेण्यास लावले. या विधानात मुलाखतीतून ८० टक्के प्रतिसाद मिळाला.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना वर्ण व्यवस्था मान्य नव्हती. वर्णव्यवस्था व अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी त्यांनी वरील उपाय वसतिगृहात योजले.

ड] <u>वसतिगृहातील मुलांचा आहार व व्यायाम याबाबतचे निष्कर्ष</u> :

वसतिगृहातील आहार साधा पण पौष्टिक [ चौरस] असावा या विधानास प्रश्नावलीत शेकडा १०० प्रतिसाद मिळाला व मुलाखतीतूनही शेकडा १०० प्रतिसाद मिळाला. नाष्टयासाठी पिठले भाकरी असे. आपले आई वडील व घरची माणसे जे अन्न खातात तेच आपणही खातो आहे. आपण फार मोठे श्रेष्ठ नाहीत. अशी विद्यार्थ्यांची सतत भावना रहावी. शिक्षण घेतल्यानंतरही घरच्या माणसात मिसळण्यास त्याला संकोच वाटू नये. खेडयात जाऊन नोकरी करणे त्याला कठीण जाऊ नये असा उदात्त हेतू त्या साध्या जेवणात होता.

वसतिगृहात सर्वांसाठी धावणे हा व्यायाम प्रकार निवडला होता. [ प्रश्नावली ८९.७४ टक्के प्रतिसाद ] कुस्ती , पोहणे हा व्यायाम घेण्यासाठीही वसतिगृहात आखाडा व विहिरी उपलब्ध आहेत. वसतिगृहात धावणे हा व्यायाम प्रकार सर्वांनाच सक्तीचा होता. व्यायाम नाही केला तर नाष्टा मिळतच नसे. [ प्रश्नावली शेकडा ५६.४१ प्रतिसाद तर मुलाखतीत शेकडा १०० प्रतिसाद ].

मामांना धावणे, कुस्ती व पोहणे हे व्यायाम प्रकार आवडत वसतिगृहातील आहार साधा पण पौष्टिक [ चौरस ] असे. वसतिगृहात कुस्तीसाठी आखाडा , पोहण्यासाठी विहिर व धावण्यासाठी मैदानाची व्यवस्था होती. [ कृपया पान नंबर — १२७ — पहावे] वसतिगृहात धावणे या व्यायाम प्रकाराची सक्ती होती.

इ] <u>नेतृत्व गुण व श्रम निष्ठा याबाबतचे निष्कर्ष –</u>

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांची वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्याला वादविवादात भाग घेता आला पाहिजे असे मामांचे मत होते. यासाठी आठवड्याच्या सभेत प्रत्येकाला भाग घेण्यास मामा सांगत या विधानास प्रश्नावलीतून शेकडा ९६.१५ इतका प्रतिसाद आहे. नेतृत्वगुण वाढ व श्रमनिष्ठा यासाठी मामांनी खास योजनाच आखली होती.

मुलांचेच मंत्रिमंडळ असे सर्व कामे मुले स्वतःच करीत या विधानास प्रश्नावलीतून शेकडा ८८.४६ प्रतिसाद मिळाला. वसतिगृहात दर आठवड्यास सभा असे. उन्हाळ्याच्या सुट्टीत काम देवून आर्थिक मोबदला दिला जाई [ मुलाखत शेकडा ६५ प्रतिसाद ] व प्रश्नावली शेकडा ७९.४८ प्रतिसाद दररोज जेवणापूर्वी एक तास काम करावे लागे [ प्रश्नावली शेकडा ८०.७६ प्रतिसाद ] विहिरी विद्यार्थ्यांच्या मदतीने खोदल्या [ प्रश्नावली शेकडा ८७.१७ प्रतिसाद व मुलाखती शेकडा ९० प्रतिसाद ].

श्रमप्रतिष्ठेवर मामासाहेब व्याख्याने देत [ प्रश्नावली ३०.७६ टक्के प्रतिसाद व मुलाखतीत शेकडा ७० प्रतिसाद].

मजूर व गवंडयाचा मंत्र्यांच्या हस्ते सत्कार केला. [ पहा पान नंबर ५९] ] हुषार विद्यार्थ्यापेक्षाही कर्मवीर मामांना समाज सेवा करणारा विद्यार्थी आवडत असे. [ शेकडा ४८.७१ प्रतिसाद प्रश्नावली मिळाला ].

ई ] शेतक-यामध्ये जागृती - याबाबतचे निष्कर्ष -

याबाबतचे

शेतक-याचा माल विक्री करताना मालाची व्यापारी नासधूस करीत असत. [ प्रश्नावली शेकडा ८८.४६ प्रतिसाद ] अशाच प्रकारे कडबा विकताना दलाल व नाकेदार शेतक-यावर अन्याय करीत. अन्याय होईल तेथे प्रतिकार करा असे मामांनी सांगितले. [ प्रश्नावली ९१.०२ टक्के प्रतिसाद व मुलाखत शेकडा ८५ प्रतिसाद ] कर्मवीर मामांना शेतक-यासमोरील प्रश्नावलीतून खालील अडचणी जाणवल्या. भांडवल नाही [ ३२.९५%] शेती विषयक नवीन ज्ञान नाही [ ३०.१३%] खात्रीशिर बी-बियाणे नाही. या अडचणीवर मामासाहेबांनी उपाय केले. पत संस्था काढल्या [ प्रश्नावली ८५.८९ टक्के प्रतिसाद ] स्वत: बी-बियाणांची निर्मिती करुन रास्त भावाने शेतक-यास दिले. [प्रश्नावली २४.२३%] रोपांची निर्मिती केली. शेतकरी मेळावे भरवले व तज्ञांकडून मार्गदर्शन दिले. शेती शिक्षकांना मार्गदर्शन करण्यास लावले. [ पहा कोष्टक नंबर ४.३० पृष्ठ १०४ ]

शेतक-यावरील होणा-या अन्यायाला मामांनी वाचा फोडली. त्यांना संघटीत केले व अन्याया विरुध्द प्रतिकार करण्यास सांगितले.

प ] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी विविध व्यवसायात काम याबाबतचे निष्कर्ष -

" ज्याच्या जवळ शरीर आहे व ज्याची काम करण्याची आणि शिकण्याची इच्छा आहे. अशा विद्यार्थ्यांची शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे" असे मामांचे मत होते.

आर्थिक दृष्टया गरीब विद्यार्थ्यांना मामांनी मोफत जेवण दिले नाही. शिकत असतानाच काम करून पैसे मिळविण्याची सोय केली [प्रश्नावली ८०.८ टक्के प्रतिसाद ] विद्यार्थ्यांना काम उपलब्ध करून देता यावे म्हणून मामांनी विविध व्यवसाय सुरु केले. व्यवसाय व प्रश्नावलीतून मिळालेले शेकडा प्रतिसाद दिले आहेत.

१] दुग्ध व्यवसाय [ ९१.१% ]
२] छापखाना [ ८९.७% ]
३] कुक्कुट पालन [ ८९.७% ]
४] आडत दुकान [ ८८.४६% ]
५] वीट भट्टी [ ६५.४% ]
६] बुक डेपो [ १२.८२% ]

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीनुसार फी आकारली जात असे [ प्रश्नावली प्रतिसाद ८०.८ टक्के ]

फ ] कर्मवीर डॉ. मामासाहेबांचे जीवन व विविध समाज घटकात त्यांच्या बाबतच्या भावना - याबाबतचे निष्कर्ष.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांची राहणी अत्यंत साधी होती. [ मुलाखत ९० टक्के प्रतिसाद ] कर्मवीरांनी व्यक्तीगत जीवनात फार मोठा त्याग केला होता. [ मुलाखतीतून १०० टक्के प्रतिसाद ] मामासाहेब समाजाशी समरस होऊन लढणारे होते.

समरस होऊन लढणारे होते. असा प्रश्नावलीतून शेकडा ८८.४६ इतका प्रतिसाद आला आहे. तुकारामाची गाथा व महात्मा फुले चरित्र यांचा परिणाम मामासाहेबांच्या जीवनावर झालेला होता. [ पहा कोष्टक ४·५ ]

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर कर्मवीर भाऊराव पाटलांचा व नंतर महात्मा जोतीबा फुले यांचा परिणाम झालेला होता [ पहा कोष्टक ४·६ ]

विविध समाज घटकात मामांच्या बद्दल विविधच भावना होत्या. प्रश्नावलीवरून पुढील निष्कर्ष येतात. सर्व सामान्य खेडूत जनतेला मामा उध्दारकर्ते वाटत [४७.४%] शहरी जनतेला मामासाहेब शिक्षण तज्ञ वाटत [३५.९%] सुशिक्षित समाजात शिक्षण प्रसारक वाटत [ ४६.१५% ] विद्यापीठ वर्तुळात मामांच्याबद्दल मामा एक शिक्षणतज्ञच आहेत. अशी भावना होती [ ६९.९२% ] सरकार दरबारी मामाबद्दल समाजसुधारक होते अशी भावना होती [ ४८.७१% ]

अभ्यासकास विद्यापीठ वर्तुळातील प्रतिक्रिया अत्यंत महत्वाची वाटते.

कर्मवीर मामासाहेब जबर शारीरिक शिक्षा करीत असत. शिक्षा करणे योग्यच होते. असा प्रश्नावलीतून शेकडा ८५.९ इतका प्रतिसाद मिळाला. शिक्षण शास्त्रज्ञांचे मत शिक्षेबद्दल काहीही मत असले तरी शिक्षेमुळे मुलांना वळण लागत होते व शिक्षा उपयोगीच ठरत असे " आम्हाला मामांनी शिक्षा केली म्हणून आमच्यात सुधारणा झाली " अशी माजी विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया आहे.

म] <u>निष्कर्षांचा सारांश –</u>

१] स्त्री शिक्षणास मामासाहेब अत्यंत महत्व देत. मुलींच्या राहण्या जेवणाची सोय करणे अत्यंत महत्वाचे आहे. मुलींच्या शिक्षणाबाबतचा पालकांचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे.

२] विधवा विधुर व परित्यक्ता यांच्या बद्दल मामांना आदर होता, तरी मामांनी त्यांची वसतिगृहात जेवणाची मोफत सोय केली नाही. त्यांना काम दिले व त्यांच्या मुलांची शिक्षणाची व्यवस्था केली.

३] विधवांनी विवाह करावा पण जर मुले असतील तर विवाह न करताच मुलांचे व्यवस्थित संगोपन करावे.

४] जातीभेद, वर्णव्यवस्था व अनिष्ठ रूढी मामांना मान्य नव्हत्या. वसतिगृहात स्वयंपाकासाठी सर्व जातीजमातीतील स्त्रिया होत्या. सर्वांना एकत्रच जेवण असे. विवाहातील मानपान मामांना मान्य नव्हते. कमी खर्चातील विवाहात प्रोत्साहन दिले. अनिष्ठ रूढी बाबत मामा भाषणात कठोर प्रहार करीत.

५] वसतिगृहात साधा पण चौरस आहार असे. व्यायामाबाबत वसतिगृहात सक्ती असे.

६] नेतृत्व गुण व श्रम निष्ठा वाढीसाठी वसतिगृहात खास प्रयत्न केले जात.

७] कर्मवीर मामासाहेबांच्या वसतिगृहात दररोज शारीरिक कष्ट किमान अर्धा तास तरी करावे लागते.

८] मजूर, गवंडी व पाथ्रुड अशा लोकांचा मंत्र्याच्या हस्ते सत्कार करून श्रम प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला जाई.

९] शेतकऱ्यावरील अन्याय दूर करण्यासाठी मामांने शेतकऱ्यामध्ये जागृती केली.

१०] " ज्याच्या जवळ शरीर आहे व ज्याची काम करण्याची व शिकण्याची इच्छा आहे अशा विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली पाहिजे".

११] "दोन बोटांनी काम करणा-यांपेक्षा दहा बोटांनी काम करणा-यांची प्रतिष्ठा वाढली पाहिजे."

१२] गरीब विद्यार्थ्यांना अर्थार्जन करण्यासाठी विविध व्यवसाय सुरु करुन त्यांना काम दिले.

१३] मामासाहेबांची राहणी अत्यंत साधी व जीवन त्यागी होते.

१४] खेडूत जनता मामांना उध्दारकर्ता मानत असे तर विद्यापीठ वर्तुळात मामा एक शिक्षणतज्ञ होते असे मत होते.

१५] विद्यार्थ्यांना शिक्षा झालीच पाहिजे असे मामांचे मत होते.

५.३ शिफारशी -

अ] शिक्षण घेणा-या मुलींचे प्रमाण वाढवावयाचे असेल तर मुलींची शिक्षण घेताना राहण्या जेवणाची सोय केली पाहिजे. पालकांचा स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन बदलण्यासाठी सेवा भावी संस्थांनी प्रयत्न केले पाहिजे. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेने भारतीय बालिकाश्रम या वसतिगृहाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.
ब] विधवा, विधुर व परित्यक्ता यांना काम देवून त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली पाहिजे. प्रत्येक सेवाभावी संस्थेने सेवकांच्या शेकडा १ या प्रमाणात विधवा, विधुर व परित्यक्ता यांना कामाची संधी दिली पाहिजे.
क] कोणत्याही खाजगी संस्थेत जातपात पाळली जाणार नाही याकडे संस्था प्रमुख व शासन यांनी लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या कार्यक्षमतेप्रमाणे कामाची संधी मिळाली पाहिजे.

ड] प्रत्येक वसतिगृहातील आहार साधा पण चौरस असला पाहिजे. प्रत्येक वसतिगृहात व्यायाम करण्याच्या सुविधा असल्या पाहिजेत. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळांनी खास शिक्षकाची नेमणूक करून वसतिगृहातील मुलांच्या आहार व व्यायाम याबाबत अधिक लक्ष दिले पाहिजे.

ड] वसतिगृहातील मुलांना रोज किमान अर्धा तास तरी शारीरिक श्रम करण्यास लावावे. नेतृत्व गुण व श्रमनिष्ठा वाढावी म्हणून प्रयत्न व्हावेत. वसतिगृहात दर आठवड्याला विद्यार्थ्यांची सभा व्हावी व प्रत्येक मुलास सभेत भाग घेण्यास प्रवृत्त करावे.

ई ] प्रत्येक सेवा भावी संस्थेने कर्ज, शेतीचे नवीन ज्ञान, मालाची विक्री याबाबत शेतक-यात जागृती करावी.

प] ज्यांची काम करण्याची आणि शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्याला शिक्षण मिळालेच पाहिजे. प्रत्येक सेवा भावी संस्थेने आपल्या कुवतीनुसार गरीब पण काम करणा-या मुलांची शिक्षणाची सोय करावी.

फ] संस्था चालकाने विद्यार्थी व समाजासमोर आपल्या वागणुकीने आदर्श ठेवला पाहिजे. सेवाभावी संस्थेतील पैशाचा योग्य विनियोग झाला पाहिजे.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे जीवन सध्याच्या काळात दिपस्तंभा-सारखे मार्गदर्शन करणारे ठरणार आहे. तरी संस्थेने मामांचे जीवन चरित्र प्रसिध्द करावे. मामासाहेबांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी व्याख्याने आयोजित करावीत.

## ५.४ पुढील संशोधनासाठी विषय -

१] "कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे ग्रामीण भागाच्या शिक्षण चळवळीतील सहभागाचा चिकित्सक अभ्यास "

२] " कर्मवीर डॉ. मामासाहेबांच्या शिक्षण व्यवस्थेतील अर्थशास्त्राचा चिकित्सक अभ्यास ".

३] " कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व इतर संस्थापक यांचा तुलनात्मक अभ्यास ".

४] " कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी सुरु केलेल्या वसतिगृहाचा चिकित्सक अभ्यास".

: : : : : :